## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७९०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/११/२०१७

**१) घरातील सोन्याच्या दागीणे व नगदी पैश्याची चोरी :-**

दिनांक २५/११/२०१७ चे ०१.०० वाजता पासुन ते २७/११/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. विमल आनंदराव पराते वय ५८ वर्ष रा. न्यु फेन्डस कॉलोनी खात रोड भंडारा ही घराला ताला लावुन तिचे पती सोबत लग्न कार्याकरीता बाहेरगावी गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मधील आलमारी मध्ये ठेवलेला ५ ग्रॅम सोन्याचा सिक्का, सोन्याची मण्याची पोत डोरल्यासह ४ ग्रॅम, व नगदी १४,०००/–रु. असा एकुण ३४,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४७०,३८० भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राठोड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) शेतातील धानाचा पुंजना जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २६/११/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रेवानंद सुखराम शेंडे वय ३५ वर्ष, रा. टांगला याचे शेतामध्ये १००८ जातीचे अंदाजे ४०० भारे असलेला रचुन ठेवलेला धानाचा पुंजना यातील संशयीत आरोपीने जाळुन अंदाजे किंमती १,००,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४३५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन ढकलढुकल करुन थापड बुक्यांनी मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २७/११/२०१७ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी फागुलाल भिवा मानवटकर वय ६० वर्ष, रा. जाम हा घरुन बस स्थानक चौक येथे जात असता बस स्थानक चौकात आरोपी हा मिळाला असता त्यास फिर्यादीने 'माझा मोबाईल तु नेला आहेस माझे मोबाईल मला दे' असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीस ढकलढुकल करुन रोडवर खाली पाडुन थापड बुक्यांनी मारहान केल्याने फिर्यादीचे दोन पडले व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२५,५०४,५०६ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंकी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी . :-**

दिनांक २७/११/२०१७ चे १९.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ज्ञानेश्वर जगन टांगले वय ४९ वर्ष, रा. गोपेवाडा याचे जखमी वडील जगन केशरी टांगले वय ७२ वर्ष, रा. गोपवाडा हे त्याचे सायकलने कार्यक्रमास ज्ञानेश्वर सभागृहात जात असतांना यातील समोरुन येणाऱ्या आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन जखमीच्या सायकलला शहापुर येथे धडक मारुन जखमी केल्याने व मागे बसणारा साहील सावंत सत्याल वय २२ वर्ष, रा. भंडारा यास व आरोपी मोटर सायकल चालक हा स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भा.दं.वी. सहकलम १८४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

५) दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २७/११/२०१७ चे १०.२० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील अल्टो कार दारूचे नशेत चालविंतानी मिळुन आल्याने त्याचे डॉ. परिक्षण रिपोर्ट वरून सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

६) विष प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु .:–

दिनांक २६/११/२०१७ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील मृतक धर्मेन्द्र रामलाल वरठी वय २८ वर्ष, रा. सर्पेवाडा याने विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्यने डॉ. मेमो वरुन पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. टेंभुर्णे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

७) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :–

दिनांक २७/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन करडी, तुमसर, पवनी, अडयाळ साकोली , लाखांदुर व दिघोरी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४१ लिटर हातभट्टी दारू किंमती ४१००/–रू. व ०२ लिटर ५२० मिली लिटर देशी दारु किंमती ७२८/–रु. किंमती ४८२८/–रु. तसेच जुगारातुन किंमती ४८७८/–रु. असा एकुण किंमती ९,७०६ /–रु. चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २७/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०३ तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व ईतर वाहनांवरती ९७ केसेस करण्यात आलेले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.